पुढारी

# कामगारांच्या मुलांना स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन

**मुंबई : प्रतिनिधी**

कामगारांच्या पाल्यांसाठी राज्यात लवकरच स्पर्धा परिक्षा वर्ग सुरु करण्यात येणार आहेत. महाराष्ट्र कामगार कल्याण मंदळाच्या केंद्रामध्ये हे वर्ग सुरु होणार आहेत. यात युपीएससी, एमपीएससी सह बँकिंग, लिपिक, स्टाफ सिलेक्शन अशा महत्त्वाच्या सरळसेवा भरती परिक्षांचा समावेश आहे. कामगारमंत्री संभाजीराव पाटील-निलंगेकर यांच्या निर्देशानुसार ही योजना सुरु करण्यात येणार आहे. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाची २२७ केंद्रे आहेत. या केंद्रामध्ये कामगार कुटुंबीयांसाठी शिवणवर्ग, शिशुमंदीर, वाचनालये, अभ्यासिका असे विविध उपक्रम राबवले जातात. परंतु मंडळाने कौशल्य विकास प्रशिक्षण आणि रोजगारभिमुख योजना राबविण्याकडे अधिक लक्ष द्यावे असे निर्देश कामगारमंत्री यांनी दिले आहेत.

Mumbai Edition
5 July, 2018 Page No. 4
Powered by : erelego.com